# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,**

**जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.**

**Website- www.sic.maharashtra.gov.in**

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :३०५/२०२३/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** |
| श्रीमती. ॲड पुनम छगन खाचणे, रा.सी.-१०५, इलाईट लॅडमार्क, खरवई नाक्याजवळ, उषाकिरण रेसीडेन्सी पुढे, कोंडेश्वर रोड, जुवेली, बदलापूर (पु.), ता. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१५०३. | सहाय्यक अधीक्षक, नाशिक महानगरपालिका, सातपूर विभागीय कार्यालय, सातपूर, ता. जि. नाशिक. |

## सुनावणी दिनांक १०/०६/२०२५

तक्रारदार यांनी दिनांक ०१/०४/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तर तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक ०१/०४/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "दि. ०१/१०/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विभागीय अधिकारी, सातपूर तथा प्रथम अपीलीय अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडून माहिती मिळालेली नाही. सदरील माहिती मिळणे हे कायद्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

तरी, वरील माहिती मिळावी ही आपणांस विनंती. जेणेकरुन मला सन्माननीय न्यायालयाकडून योग्य तो न्याय मिळेल."

३) तक्रारदार यांनी दि. २९/०९/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये, दि. ०१/०१/२०१९ ते २२/०९/२०२२ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"अ.क्र.,नाशिक महानगरपालिका विभाग, बालकाचा/बालिकेचा जन्म दिनांक, बालकाचा/बालिकेचे जन्म स्थळ, बालक/बालिकेचे संपूर्ण नाव, बालक/बालिकेच्या वडीलांचे संपूर्ण नाव, बालक/बालिकेच्या आईचे संपूर्ण नाव, बालक/बालिकेच्य वडीलांचा संपूर्ण पत्ता, बालक/बालिकेच्या आईचा माहेरचा/सासरचा संपूर्ण पत्ता."

तसेच, संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने, तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय अधिकारी, सातपूर विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडे दिनांक १८/११/२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज सादर केला होता.

४) सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या दि. १४/१०/२०२२ च्या पत्रात असे नमूद केले आहे की, "तक्रारदार यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने खुलासा करण्यात येतो की, माहिती अधिकार अधिनियम (केंद्र)

२००५ चे कलम – ८ पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार जनहिताशी संबंधित नसलेली वैयक्तिक स्वरुपाची व त्रयस्त व्यक्तीची माहिती ही देता येत नाही. सबब आपला अर्ज निकाली काढण्यात आला आहे." असे तक्रारदार यांना कळविण्यात आले आहे.

तसेच तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या दि. १८/११/२०२२ च्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दि. २८/१२/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात येऊन दि. ०९/०१/२०२३ च्या आदेशान्वये खालील आदेश पारीत करुन अपील निकाली काढण्यात आले आहे.

"अपिलकर्ता श्रीमती ॲड. पुनम छगन खाचने यांनी दि. ०७/१०/२०२२ रोजीच्या मुळ माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज दाखल करुन नाशिक मनपा सातपुर जन्म- मृत्यू विभागाकडे ०१/०१/२०१९ ते २२/०९/२०२२ या कालावधीत जन्माला आलेल्या बालकांची व त्यांच्या आई- वडीलांची माहिती विहीत नमुन्यामध्ये उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा प्र. सहा. अधिक्षक, सातपुर यांनी दि. १४/१०/२०२२ रोजी विहीत मुदतीत दिलेले उत्तर बरोबर आहे.

तथापि, अपिलकर्ता यांनी अपिलाच्या वेळी केलेल्या मागणीचा विचार करता, माहिती अधिकारातील कलम ८ (त्र) नुसार, जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यांची, राज्य जन माहिती अधिकाऱ्यांची किंवा अपिल प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीज करुन, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधातील काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करीत, अशी वैयक्तिक तपशिलासंबंधातील माहिती" देण्याची आवश्यकता नाही, असे सदर नियमामध्ये अंतर्भुत आहे. त्यामुळे अपिलकर्त्या यांनी मागितलेल्या माहितीद्वारे संबंधीत व्यक्तींच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे."

(५) सुनावणीदरम्यान सादर केलेला युक्तिवाद व प्रस्तुत नस्तीवरील कागदपत्रे विचारात घेता,तक्रारदार यांनी त्यांच्या दि. २९/०९/२०२२ च्या माहिती अर्जान्वये दि ०१/०१/२०१९ ते दि. २२/०९/२०२२ या कालावधीतील साधारणत: ०३ वर्षातील विस्तृत व्यापक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ही माहिती देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागेल. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) व महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ कलम ३ (क) नुसार सदर माहिती देय ठरत नाही.

तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. १८/११/२०२२ रोजी सादर केलेले प्रथम अपील दि. ०९/०१/२०२३ अन्वये निकाली काढलेले आहे.

तसेच, प्रत्यक्ष सुनावणीस तक्रारदार हे अनुपस्थित असल्याने त्यांना कोणती माहिती मिळणे अपेक्षित होते याबाबतचा उलगडा होऊ शकला नाही. सबब, आयोग सदर प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र. ३०५/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र ८८०८ 19 NOV 2025